# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८६१/२०१७

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, एप्रिल/मे, २०१७ च्या परीक्षांसाठी M.K.C.L या अभिकरणामार्फत तसेच विद्यापीठाच्या C.C.F. विभागामार्फत ज्या शिक्षणक्रमाच्या परीक्षांचे अर्ज Online घेण्यात आलेले आहेत, या शिक्षणक्रमांच्या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश शुल्क अद्यापही ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा केलेले नसेल किंवा अनावधानाने जमा करणे बाकी राहून गेले असेल, अश्या सर्व महाविद्यालयांनी हे बाकी असलेले/राहून गेलेले परीक्षा शुल्क दि. ०५ मे, २०१७ पर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात जमा करावे. असे न झाल्यास ज्या महाविद्यालयांकडून परीक्षा शुल्क येणे बाकी आहे, अश्या महाविद्यालयांकडून या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील, यास संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील तसेच संबंधीत महाविद्यालयास संभाव्य कारवाईस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, या परीक्षांसाठी प्रविष्ठ झालेली विद्यार्थी संख्या व या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेले परीक्षा शुल्क या संबंधीचे सर्व दस्तावेजाचा तपशील पडताळणी कामी तयार ठेवण्यात यावा व परीक्षा विभागाकडून पडताळणी कामी मागणी करण्यात आल्यावर त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावा. ही विनंती.

वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मुंबई – ४०००९८
दि. १७ एप्रिल, २०१७.

(दीपक वसावे)
स्था. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/ संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेद्रांचे समन्वयक/संचालक